**इंडियन रेड क्रॉस सोसायटी संचलित पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा येथील बेल एअर या संस्थेला सहायक अनुदान वितरीत करण्याबाबत...**

## महाराष्ट्र शासन

### सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः स्वसंअ-२०२६/ प्र.क्र.१३८/राकावि (ई-१६७८३३३),**

गो.ते.रूग्णालय आवार, संकूल इमारत, १० वा मजला,
बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४००००१
दिनांक : २३ जून, २०२६

<u>वाचा</u> :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क. १२९ / आरोग्य- ४, दि. २७ मार्च २०१८

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र. मुदतवाढ २०२३/प्र.क्र.१२२/ आरोग्य-४, दिनांक ७ जून, २०२३

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक २५.०७.२०२४

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शा. नि. क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.८५/राकावि,दि. २४.०९.२०२५

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शा. शुद्धीपत्रक क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.८५/राकावि,दि. २४.०९.२०२५

६) सार्वजनिक आरोग्य विभाग, शा. नि. क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.१७२/राकावि,दि. २८.११.२०२५

७) सार्वजनिक आरोग्य विभाग, शा. नि. क्र.पुमाअ-२०२५/प्र.क्र.१४५/राकावि,दि. ३०.०३.२०२६

८) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्र. ससंआसे/कक्ष ६४/गुरु महाबळेश्वर/ अनुदान २५-२६/१६३०/२६, दिनांक १४.०५.२०२६

<u>प्रस्तावना</u> :-

महाबळेश्वर जि. सातारा येथील ग्रामीण रुग्णालय चालविण्याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा व इंडियन रेड क्रॉस सोसायटी संचलित पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा येथील बेल एअर संस्था यांमध्ये दिनांक १६.११.२०२३ रोजी झालेल्या करारानुसार बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा ह्या संस्थेस पाच वर्षाचे कालावधी करीता म्हणजेच दि.३१ मार्च, २०२८ पर्यंत ग्रामीण रुग्णालय, महाबळेश्वर प्रायोगिक तत्वावर अटी व शर्तींच्या अधीन राहून चालविण्यासाठी

देण्यात आलेले आहे. तसेच, सदरहू करारामध्ये, आर्थिक वर्षाच्या दर तिमाहीअखेर अथवा दरमहा येणारा खर्च परिगणित करुन आलेल्या खर्चाच्या ७० टक्के रक्कम आणि संस्थेचे वार्षिक लेखापरिक्षण झाल्यानंतर (ताळमेळ झाल्यानंतर) उर्वरित ३० टक्के अनुदानाची मागणी करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार, यापूर्वी सदरहू संस्थेला सन २०२४-२५ मधील दिनांक ०१.०१.२०२५ ते दिनांक ३१.०३.२०२५ या चौथ्या तिमाहीचे १००% आणि सन २०२५-२६ मधील दिनांक ०१.०४.२०२५ ते दिनांक ३०.०६.२०२५ या पहिल्या तिमाहीकरीता ७०% असे एकूण रु.१,८४,३३,९३९/- इतके सहायक अनुदान वितरीत करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २४.०९.२०२५ व दिनांक २७.१०.२०२५ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर, सन २०२५-२६ मधील दिनांक ०१.०७.२०२५ ते दिनांक ३०.०९.२०२५ या दुसऱ्या तिमाही कालावधीकरीता झालेल्या खर्चाच्या ७०% नुसार एकूण रुपये ४६,९६,८६७/- इतके सहायक अनुदान व तिसऱ्या तिमाही कालावधीकरीता झालेल्या खर्चाच्या ७०% नुसार एकूण रुपये १,४३,२५,९२६/- सहायक अनुदान वितरीत करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २८.११.२०२५ व दिनांक ३०.०३.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. आता, सदरहू संस्थेला सन २०२५-२६ च्या पहिल्या तीन तिमाही कालावधीत झालेल्या खर्चाच्या उर्वरीत ३०% व चौथ्या तिमाहीचे १००% असे एकूण रुपये १,३०,०३,९३९/- इतके सहायक अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा ह्या संस्थेस सन २०२५-२६ च्या पहिल्या तीन तिमाही कालावधीत झालेल्या खर्चाच्या उर्वरीत ३०% व चौथ्या तिमाहीचे १००% असे एकूण रुपये १,३०,०३,९३९/- इतक्या देयकाची अदायगी करण्यासाठी एकुण रुपये.१,३०,०३,९३९/- (अक्षरी रुपये एक कोटी तीस लक्ष तीन हजार नऊशे एकोणचाळीस) इतके सहायक अनुदान, विहित कार्यपध्दतीने खर्च करण्यात येईल, या अटीच्या अधिन राहून अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील ०१- नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ११०-रुग्णालये व दवाखाने, ११० (०३) (०१)-सहायक अनुदाने अध्यापनेत्तर रुग्णालये व दवाखाने यांना सहायक अनुदान, ३१-वेतनेत्तर, लेखाशीर्ष २२१० ०१७३” या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ साठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करण्यात आलेल्या तरतूदीतून भागवावा.

३. बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा ह्या संस्थेस अनुदान वितरीत करण्यास जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा ह्या संस्थेस ज्या अटी व शर्ती लागू आहेत. त्यांचे पालनासंबंधीची तपासणी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी करणे आवश्यक आहे.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्या कार्यालयाकडुन बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा या संस्थेच्या सहायक अनुदावरील खर्चाचे हिशोबाची निरिक्षणासाठी मागणी केली जाईल, त्यावेळी आवश्यक अभिलेख महालेखापाल कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

६. बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा यांनी शासकीय अनुदान म्हणून मिळणाऱ्या रकमेचे हिशेब त्यांच्या नेहमीच्या इतर कार्यक्रमातून वेगळे ठेवणे आवश्यक आहे.

७. बेल-एअर हॉस्पिटलसाठी मंजूर नसलेल्या बाबींवरील खर्चाचा समावेश सहायक अनुदानाच्या रक्कमेतुन करण्यात आल्याचे आढळून आल्यास अथवा सहायक अनुदानाचा गैरवापर झाल्याची बाब निदर्शनास आली असल्यास, सदर रक्कमेची एक रकमी वसुली करण्याचा अधिकार शासनास राहील, त्याकरिता वेळेचे बंधन असणार नाही.

८. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार वित्तीय अधिकार नियमामध्ये करण्यात आलेल्या सुधारणाप्रमाणे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ चा भाग पहिला, उपविभाग-एक अनुक्रमांक २७ मधील नियम क्र.१४९ नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौसं ४९८/२०२६/व्यय -१३ दि. १५.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२३१०२७३१५९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT
HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.06.23 17:29:39 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

२. संचालक, आरोग्य सेवा (२), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा ( अर्थसंकल्प व प्रशासन ), मुंबई/पुणे.
४. उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
५. सहाय्यक संचालक, ( लेखा व सेवा परिक्षा ), आरोग्य सेवा, पुणे.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा ),महाराष्ट्र-१, मुंबई.
७. जिल्हा कोषाधिकारी, ठाणे/ पुणे.
८. वित्त विभाग (अर्थ-३/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई-३२.
९. अवर सचिव ( अर्थसंकल्प ), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुबई.
१०. अध्यक्ष, बेल-एअर हॉस्पिटल, पाचगणी महाबळेश्वर, जि.सातारा.
११. निवड नस्ती (राकावि).